Semester -III

Practicum
C-1 :School Internship(As given in seme. II)

शालेय आंतरवासिता टप्पा २

Period : 11 Weeks	Total Marks: 325
Credit: 13	Internal Assessment: 325 Marks
Total Hours : 396	

प्रास्ताविक ः

प्रत्येक व्यवसायाला संबधित क्षेत्रातील तज्ज्ञता असावी लागते. तज्ज्ञता प्राप्त करणेसाठी उमेदवाराला पूर्वतयारी करणे आवश्यक असते. शिक्षक हा सुद्धा एक व्यवसाय आहे. इतर व्यवसायाप्रमाणे शिक्षक निर्मितीलाही पूर्वतयारी करणे व विविध अनुभव देणे जरूरीचे आहे. सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये आंतरवासिता रूढ आहे. विद्यार्थी शिक्षकांना शिक्षकांचा प्रत्यक्ष किंवा वास्तव अनुभव मिळावा म्हणून एन. सी. टी. ई. आराखडा २०१४नुसार द्विवर्षीय बी. एड. अभ्यासक्रमामध्ये शालेय आंतरवासितेचा समावेश करण्यात आलेला आहे. प्राचार्य,, मुख्याध्यापक, मार्गदर्शक प्राध्यापक, शालेय शिक्षक, सहकारी विद्यार्थी शिक्षक यांचा समृद्ध अनुभव, सहकार्य व मार्गदर्शन याद्वारे सक्षम शिक्षक तयार होतील याची खात्री वाटते.

आंतरवासिता उपक्रमामुळे बालक, पालक, शिक्षक, समाज व राष्ट्र या सर्वांची आव्हाने पेलणारा सक्षम अध्यापक निर्माण होऊ शकेल. परिपूर्ण व अनुभवयुक्त सक्षम शिक्षक सुरूवातीपासून मिळाल्यास अध्यापन दर्जेदार होण्यास मदत होईल. शालेय आंतरवासिता हा बी. एड. अभ्यासक्रमाचा आत्मा आहे हे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. म्हणजेच शालेय आंतरवासितेद्वारे विद्यार्थी शिक्षक हे शिक्षकी व्यवसायाशी

समरस होऊन शाळा आणि समाज यांच्या विकासाशी बांधीलकी व क्षमता राखणारा राहील अशी आशा वाटते.

उद्दिष्टे :

१. विद्यार्थी शिक्षकांना प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर अध्यापनाची गतीशिलता समजून घेण्यास सक्षम बनविणे.

२. विद्यार्थी शिक्षकांना शाळेची तात्विक पार्श्वभूमी, मातृसंस्थेची ध्येये, उद्दिष्टे, संघटन व व्यवस्थापन यांचे आकलन होण्यास सक्षम बनविणे.

३. विद्यार्थी शिक्षकांस नियोजन, अध्यापन व मूल्यनिर्धारण या सर्व शालेय उपक्रमामध्ये सहभागी होण्यास मदत करणे.

४. विद्यार्थी शिक्षकांना शालेय शिक्षक, सामाजिक सदस्य व शालेय विद्यार्थी या सर्वांविषयी आंतरक्रिया प्रस्थापित करण्यास मदत करणे.

५. विद्यार्थी शिक्षकांना शालेय शिक्षकांचे जीवन, जबाबदारी, कर्तव्ये व सामाजिक बांधिलकी समजून घेण्यास सक्षम बनविणे.

६. विद्यार्थी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकासाच्या गरजा लक्षात घेऊन नियमित शिक्षकाची भूमिका समजून घेण्यास मदत करणे.

७. विद्यार्थी शिक्षकांमध्ये अभ्यासक्रमाचे पैलू व त्याची गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी आणि अध्ययन अध्यापनाचे मूल्यनिर्धारण समजून घेण्याचे कौशल्य विकसित करण्यास मदत करणे.

८. विद्यार्थी शिक्षकांना शालेय विद्यार्थ्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी सज्ज करणे.

९. विद्यार्थी शिक्षकांना शालेय आंतरवासितेमध्ये शालेय अनुभव कार्यक्रमाचे आयोजन, संघटन व चिकित्सक चिंतन करण्यास मदत करणे.

१०. सद्यस्थितीतील शाळामध्ये असणा-या मर्यादाबाबत बदल घडवून आणण्याची क्षमता प्राप्त करण्यास मदत करणे.

११. विविध उपक्रम, स्पर्धा यांची काळजीपूर्वक निवड व संघटन करून त्याचे आयोजन करण्यास सक्षम बनवणे.

१२. प्रत्येक विद्यार्थी शिक्षकांने शालेय अनुभव कार्यक्रमाचे चिकित्सक चिंतन करणे व त्याच्या नोंदी ठेवणे यासाठी मदत करणे.

आंतरवासिता कालावधी ः

१. शालेय आंतरवासिता टप्पा २ मध्ये एकूण ११ आठवडे कालावधी असावा.त्यामध्ये आंतरवासिता पूर्व कार्यक्रम ः कालावधी दोन आठवडे आंतरवासिता कार्यक्रम ः कालावधी आठ आठवडे व उत्तर आंतरवासिता कार्यक्रम ःकालावधी एक आठवडा असा कालावधी असावा.

२. विद्यार्थी शिक्षकांने बी.एड.सत्र १ व २ ची सैद्धातिंक आणि प्रात्यक्षिक कार्य पूर्ण केल्यानंतर सत्र ३ मध्ये हे कार्य पूर्ण करावयाचे आहे. यासाठी १५ जूलैपासून किंवा महाविद्यालयाच्या सोयीनुसार आवश्यक कार्यशाळा पूर्ण करून व आवश्यक पूर्वतयारीनंतर आंतरवासितेला सुरवात करावी.

आंतरवासितेसाठी संधी ः

१. जर विद्यार्थी शिक्षकांने तृतीय सत्रामधील शालेय आंतरवासिता टप्पा २ हा भाग पूर्ण केला नाही तर चतुर्थ सत्रातील सराव पाठ परीक्षेसाठी विद्यार्थी शिक्षकास बसता येणार नाही.

२. आंतरवासितेसाठी कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास विद्यार्थी शिक्षकाना आगामी एक वर्षामध्ये हे कार्य पूर्ण करण्यास संधी उपलब्ध करून द्यावी.

३. आंतरवासिता कालावधीत विद्यार्थी शिक्षकाना एकूण ४ दिवसाची नैमत्तिक रजा देय राहिल. ही रजा मार्गदर्शक प्राध्यापक व संबधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी मंजूर करावी.

४. आंतरवासिता कालावधीत विद्यार्थी शिक्षकांचे गैरवर्तन किंवा शैक्षणिक हानीकारक वर्तन याबद्दल तक्रार आढळून आल्यास त्याची आंतरवासिता तात्काळ रद्द करण्याचा अधिकार मार्गदर्शक प्राध्यापक, मुख्याध्यापक आणि प्राचार्य यांच्याकडे असेल.

आंतरवासिता कालावधीतील संपर्क :

१. आंतरवासिता कालावधीत अध्यापक महाविद्यालयाने सराव पाठ शाळेमधील मुख्याध्यापकांच्या अनुमतीने पर्यवेक्षक किंवा एका अनुभवी शिक्षकाची 'शालेय संपर्क शिक्षक' म्हणून मान्यता घ्यावी.

२. विद्यार्थी शिक्षकांवर नियंत्रण ठेवणे आणि महाविद्यालय व शाळा यांचा दुवा म्हणून 'शालेय संपर्क शिक्षक' यांनी काम करावयाचे आहे.

३. आंतरवासिता कालावधीत अध्यापक महाविद्यालयाने विद्यार्थी शिक्षकांच्या प्रत्येक महिन्यात एक याप्रमाणे दोन बैठका आयोजित कराव्यात. या बैठका शाळेमध्ये आयोजित कराव्यात. बैठकीमध्ये मुख्याध्यापक, प्राचार्य, मार्गदर्शक प्राध्यापक आणि शालेय संपर्क शिक्षक यांचा समावेश असावा.

४. बैठकीमध्ये झालेल्या कामाचा आढावा, अडचणी, पुढील कृती, कार्यक्रम इत्यादी नियोजन संबंधी मार्गदर्शन करावे.

५. आंतरवासिता कालावधीत मार्गदर्शक प्राध्यापकाचा संपर्क हा प्रत्येक आठवड्यात दोन दिवस राहिल. यामध्ये वार निश्चित करण्याची जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहिल.

आंतरवासिता स्वरूप व कार्यवाही :

अ) आंतरवासिता पूर्व कार्यक्रम(Pre-Internship) :कालावधी दोन आठवडे

१. आंतरवासितेसाठी शाळेची निवड करणे

आंतरवासितेसाठी शाळेची निवड करताना खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येईल.

१. महाविद्यालयाचे प्राचार्य

२. महाविद्यालयाचे विभाग प्रमुख

३. सराव पाठ विभाग प्रमुख

४. माध्यमिक विभाग गट शिक्षणाधिकारी

५. विद्यार्थी शिक्षक प्रतिनिधी

२. शाळेची निवड करताना या सर्व शाळा २५ कि.मी. अंतराच्या आतील असाव्यात. कोणत्याही परिस्थितीत जिल्हा बदल असता कामा नये.

३. प्रत्येक शाळेत ७ ते ८ विद्यार्थी शिक्षकांचा समावेश असावा.यामध्ये सर्व शालेय विषयाचे विद्यार्थी शिक्षक येतील याकडे लक्ष द्यावे.

४. आंतरवासितेसाठी निवडलेल्या शाळांच्या मुख्याध्यापक व शालेय संपर्क प्रमुख यांची महाविद्यालयामध्ये सहविचार सभा आयोजित करावी. सहविचार सभेमध्ये आंतरवासितेची उद्दिष्टे, स्वरूप, एकूण कार्यवाही व मूल्यमापन पद्धती समजावून द्यावी.शक्यतो गटशिक्षणाधिकारी यांचा सहभाग व सहकार्याने सहविचार सभा आयोजित करावी.

५. आंतरवासितेसाठी निवडलेल्या शाळांना आंतरवासितेच्या संकलित कार्यक्रमाची मार्ग दर्शिका द्यावी.

६. ज्या विद्यार्थी शिक्षकांनीपदव्युत्तर पदवी संपादन केली आहे अशा विद्यार्थी शिक्षकांचा उच्च माध्यमिक शाळांमध्ये सराव पाठासाठी समावेश करावा.

७. महाविद्यालयातीलसराव पाठ विभागाने मार्गदर्शक प्राध्यापकाना एकंदर आंतरवासिता व अनुषंगिक कामे आणि जबाबदारी, कामकाज, निरीक्षणे, नोंदी, मूल्यमापन इत्यादीसंबंधी सविस्तर सूचना द्याव्यात.

८. विद्यार्थी शिक्षकांचे गट करून प्रत्यक्ष आंतरवासितेपूर्वी एक आठवडा आधी महाविद्यालयातील सराव पाठ विभागाने उदबोधन करून आवश्यक पूर्व तयारी

करावी.उद्बोधनामध्ये एकूण जबाबदारी, कामकाज, निरीक्षणे, नोंदी, मूल्यमापन इत्यादीसंबंधी सविस्तर सूचना द्याव्यात.

९. मार्गदर्शक प्राध्यापक यांनी विद्यार्थी शिक्षकांचे सर्व काम पूर्ण करून घेणे, वेळच्या वेळी नोंदी ठेवणे, अचूक मार्गदर्शन करणे, शेरे पुस्तकामध्ये अभिप्राय नोंदवणे, उपस्थिती पत्रक पाहणे, रजा मंजूर करणे, प्रत्याभरण देणे, सूचना देणे, मदत पुरविणे, पारदर्शक मूल्यमापन करणे, गुणदान करणे इत्यादी बाबीची जबाबदारी पार पाडावी.

१०. मार्गदर्शक प्राध्यापक यांनी महाविद्यालय, प्राचार्य, शाळा, मुख्याध्यापक, शालेय शिक्षक यांच्यामध्ये समन्वयाची भूमिका राखावी लागेल.

११. शालेय आंतरवासिता टप्पा २ मार्गदर्शक प्राध्यापकांच्या निरीक्षणाखाली महाविद्यालयाने निवड केलेल्या शाळेमध्ये पूर्ण करावा.

१२. प्रत्येकविद्यार्थी शिक्षकाने शालेय आंतरवासितेच्या सर्व उपक्रमामध्ये सहभागी झाले पाहिजे.

१३. आंतरवासिता कालावधीत विद्यार्थी शिक्षकाने पूर्ण वेळ शाळेत उपस्थित रहावे. या कालावधीत सराव पाठ व अनुषंगिक प्रात्यक्षिक कार्ये पूर्ण करावीत.

१४. विद्यार्थी शिक्षकांनी सराव पाठ शाळामधून नियोजनासाठी घटक आणावेत.पाठ टाचणे काढावीत, मार्गदर्शन घ्यावे, कामाची जबाबदारी वाटून घ्यावी व अनुषंगिक पूर्वतयारी करावी.

१५. विद्यार्थी शिक्षकांनी कामकाज, निरीक्षणे, नोंदी, मूल्यमापन इत्यादीसंबंधी तक्ते तयार करावेत.

१६. विद्यार्थी शिक्षकांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन व घटक चाचणी याची माहिती घ्यावी.

ब) आंतरवासिता काळ (Internship)ः कालावधी आठ आठवडे

निवडलेल्या शाळांमध्ये प्रत्यक्ष आंतरवासिता कालावधीत विद्यार्थी शिक्षकांच्या गटाने मार्गदर्शक प्राध्यापक, मुख्याध्यापक, शालेय संपर्क शिक्षक यांच्या मदतीने

संकलित कार्यक्रमाची अमंलबजावणी करावी.विद्यार्थी शिक्षकांनी पार पाडावयाची कामे काही गटवार तर काही वैयक्तिक आहेत.कामाची यादी पुढीलप्रमाणे आहे.

विद्यार्थी शिक्षकांनी करावयाची कामे, उपक्रम व नोंदी ः

१. **वर्गाध्यापन किंवा सराव पाठ** ः विद्यार्थी शिक्षकानी त्यांच्या निवडलेल्या प्रत्येक अध्यापनशास्त्र विषयांचे किमान २० पाठ पूर्ण करणे आवश्यक आहेत. त्याचे विवरण पुढीलप्रमाणे (निवडलेल्या प्रत्येक अध्यापनशास्त्र विषयांचे संगणकाधारित पाठ -१,ज्ञानरचनावादी पाठ-१०, विविध अध्यापन पद्धती पाठ-५, कृती आधारित पाठ-३, वइतर पाठ- १० त्यातील दोन घटकाच्या सलग अध्यापनासाठी ५ व ५ तास) सराव पाठासाठी प्रत्येकाने इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतचे वर्ग निवडावेत. ज्या विद्यार्थी शिक्षकानी पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे अशांनी उच्च माध्यमिक स्तरावर अध्यापन सराव करावा.सर्व विद्यार्थी शिक्षकानी पाठ टाचणे व इतर नोंदी जतन कराव्यात.

२. **जादा तास** ः जादा तास/बुलेटिन तास/शारीरिक शिक्षण मार्गदर्शन तास/व्यक्तिमत्व तास / कार्यानुभव मार्गदर्शन तास (किमान १० पाठ)सदर तासिकेची संक्षिप्त नोंदी ठेवाव्यात

३. **सराव पाठ निरीक्षणे** ः निवडलेल्या प्रत्येक अध्यापनशास्त्र विषयांचे आपल्या सहाध्यायाच्या किमान ३० सराव पाठांचे निरीक्षण करावे.त्याचे विवरण पुढीलप्रमाणे (संगणकाधारित पाठ- २,ज्ञानरचनावादी पाठ-१०, विविध अध्यापन पद्धती पाठ -५, कृती आधारित पाठ-२, इतर पाठ -६). सरावपाठांचे निरीक्षणासाठी ‘पाठ निरीक्षण नोंद वही’ तयार करावी व त्यामध्येनिवडलेल्या प्रत्येक अध्यापनशास्त्र विषयांचे तसेच इतर अध्यापनशास्त्र विषयांचे ५ पाठांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

४. **एकंदर कामाची जबाबदारी** ःगटांतर्गत मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, वर्गशिक्षक, विविध विभाग प्रमुख इत्यादीसाठी जबाबदारी विद्यार्थी शिक्षकाना विभागून द्यावी.विद्यार्थी शिक्षकानी सोपविलेल्या जबाबदारी समजून

घ्यावी आणि त्याप्रमाणे पार पाडलेल्या जबाबदारीचा अहवाल तयार करावयाचा आहे.

५. **दैनंदिन परिपाठ नोंदवही** : दैनंदिन परिपाठाचे नियोजन करून दररोज त्याची अंमलबजावणी व्हावी.अभिरूप मुख्याध्यापक व शालेय संपर्क शिक्षक यांच्या मदतीने संकलित कार्यक्रमाची अमंलबजावणी करावी.

६. **दिनदर्शिका(Calendar)** : विद्यार्थी शिक्षकानी आंतरवासिता कालावधीसाठीमार्गदर्शक प्राध्यापक व सराव पाठशाळा यांच्या मदतीने सर्व दिवसाची दिनदर्शिका **(Calendar)**तयार करावी.दिनदर्शिकेप्रमाणे कामकाज होईल याची दक्षता अभिरूप मुख्याध्यापक व शालेय संपर्क शिक्षक यांनी घ्यावयाची आहे.

७. **मासिक उपस्थिती पत्रक (Muster)** : विद्यार्थी शिक्षकांचे उपस्थिती पत्रक स्वतंत्रपणे तयार करून ठेवावे. दररोज विद्यार्थी शिक्षकांनी त्यावर सही करावी.मार्गदर्शक प्राध्यापक यांनी उपस्थिती पत्रकावर सर्वात शेवटी सही करावी. स्वतंत्र उपस्थिती पत्रक महिनाअखेरीस शालेय मुख्याध्यापकांकडून सही शिक्क्यानिशी प्रमाणित करून घ्यावे.

८. **शेरे पुस्तक** : विद्यार्थी शिक्षकाने आंतरवासिता कालावधीसाठी स्वतःचे शेरे पुस्तकठेवावे.मार्गदर्शक प्राध्यापक, प्राचार्य, मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षक यांच्या अभिप्रायासाठी प्रसंगानुरूप सादर करावे.

९. **घटक चाचणी व निकालपत्रक** : विद्यार्थी शिक्षकानासोपविलेल्या वर्गाच्या अध्यापनशास्त्र दोन्ही विषयासाठीएका घटकाचे सलगपणेएकाच वर्गावर अध्यापन करावे. त्याच घटकावर आधारित घटक किंवाप्राविण्य चाचणी निर्मिती करणे, चाचणी घेणे, संख्याशास्त्रीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करणे.निकालपत्रक तयार करणे.यामध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा समावेश करणे आवश्यक आहे.

१०. **दैनिक टाचण वही** ःसोपविलेल्या विषयाचे पाठाचे वेळापत्रकाप्रमाणे दैनिक टाचण वही तयार करावी. टाचण वहीदररोज अभिरूप मुख्याध्यापक वज्यावेळी मार्गदर्शक प्राध्यापक येतील तेव्हात्यांना दाखवून त्यांच्या सह्या घ्याव्यात.

११. **सहशालेय उपक्रम नियोजन व आयोजन** ः क्रीडा महोत्सव(Indoor and Outdoor) /सहल/ हस्तलिखीत /बौद्धिक स्पर्धा/वाचन संस्कृती/ विविध मंडळ स्थापन करणे व त्याद्वारे उपक्रम /स्वतः पुढाकार घेऊन राबविलेले उपक्रम इत्यादी सदर उपक्रमापैकी किमान तीन उपक्रमांचे आयोजन, नियोजन करावेआणि त्यासंबंधीचे अहवाल लिहावेत.

१२. **शालाबाह्य शिक्षण उपक्रम** ःपुढीलपैकी एका उपक्रमाची प्रत्यक्ष माहिती घेऊन त्याचाअहवालतयार करावा. उदा. शिक्षक पालक संघ/ग्रामशिक्षण समिती सभा/ वार्ड शिक्षण समिती सभा/वाचनालय भेट इत्यादी.

१३. **व्यक्ती अभ्यास**(Case Study) ःनिवडलेल्या शाळेतीलदोन विशेष विद्यार्थ्यांच्या प्रासंगिक नोंदी ठेवाव्यात. म्हणजेच दिव्यांग, अप्रगत, हुशार विद्यार्थ्यांचा व्यक्ती अभ्यास(Case Study) करून त्यांना व त्यांच्या पालकांना मार्गदर्शन व समुपदेशन करणे आणि प्रोत्साहन देणे तसेच त्याचे अहवाल लेखन करावे.

१४. **सामाजिक वृद्धी कार्यक्रम** ःसामाजिक बांधीलकी जोपासण्यासाठी समाजाचा एक जबाबदार नागरिक या नात्याने शिक्षकानी काही समाजाशी निगडित उपक्रम हाती घेणे गरजेचे आहे. यातील किमान दोन उपक्रम घेऊन त्याचा अहवाल तयार करावा. उदा. सामाजिक समस्या जाणीव जागृती/पर्यावरण बचाव/उर्जा बचत/ जल संधारण/अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम/ एडस जाणीव जागृती/ स्वच्छ भारत अभियान/ कौशल्य भारत/SUPW /ग्राम पाहणी/विविध प्रदर्शन आयोजन/कुटुंब पाहणी इत्यादीयासाठी फेरी, शिबीर, चित्र प्रदर्शन, भित्तीपत्रक अशासारखे कार्यक्रम आयोजित करावेत.

१५. **कृती संशोधन**ः शालाधारित कृती संशोधन योग्य नमुन्यामध्ये मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मदतीने या कालावधीमध्ये पूर्ण करावे. मार्गदर्शकप्राध्यापकांनी प्रमाणित केलेला कृती संशोधन अहवाल जमा करावा.

१६. **मानसशास्त्रीय चाचणी** : कोणत्याही एका वर्गावर मानसशास्त्रीय चाचणीचे प्रशासन करावे. स्वतःचे अनुभव व समुपदेशन यासंबधी कार्यवाहीचा अहवाल लिहावा.

१७. **चिंतन दैनंदिनी**: विद्यार्थी शिक्षकांनी मार्गदर्शक प्राध्यापकांच्या निरीक्षणाखाली दररोज पूर्ण होतील अशा उपक्रमाविषयीच्या नोंदी व त्यावरील स्वअनुभवाचे मनन, चिंतन यांच्या नोंदी म्हणजे **चिंतन दैनंदिनी** होय. शालेय आंतरवासितेमधील विद्यार्थी शिक्षकांना दररोज येणाया अनुभवाच्या विश्लेषणात्मक नोंदीचा लिखित मसूदा म्हणून चिंतन दैनंदिनी कार्य करणार आहे. चिंतन दैनंदिनी मध्ये कृतीवर विमर्शी चिंतन करणे हा मुख्य उद्देश आहे. सैध्दांतिक भाग व प्रात्यक्षिक भाग यांचे एकात्मिकरण, यशाचे विश्लेषण, अपयशाचे व्यवस्थापन, पूरक घटकांचा उपयोग, भविष्यातील अडथळे, भविष्यकालीन कृतीमध्ये दुरूस्ती, विकासात्मक कृती, इत्यादी घटकांचा समावेश करून चिंतन दैनंदिनीचा आराखडा तयार करावयास हवा. प्राध्यापकांचे मार्गदर्शन, सहाध्यायांशी चर्चा, शालेय शिक्षकांशी चर्चा करून चिंतन दैनंदिनी पूर्ण करावी. एकूण ११ आठवडयाची चिंतन दैनंदिनी तयार करावी.

१८. **अभिरूप शासकिय पाहणी** :अभिरूप शासकिय पाहणीची माहिति सराव पाठ शाळेचेमुख्याध्यापक किंवा प्राचार्य व अनुभवी शिक्षक यांचेकडून घ्यावी.

१९. **दरमहा उपस्थिती पत्रक (Catalogue):** सोपविलेल्या वर्गाचेदरमहा उपस्थिती पत्रक (Catalogue) करावेत. संवर्गनिहाय विगतवारीची नोंद करावी.

२०. **स्व विकास वृध्दी** : सूत्रसंचालन करणे, कार्यक्रम पत्रिका तयार करणे, कार्य क्रमाचा अहवाल करणे इत्यादी कामे स्व विकास वृध्दीसाठी करावीत.

२१. **प्रदर्शनीय फलक** :विविध विषय मंडळ, अवांतर माहिती, चित्रे, पोस्टर्स, कोडी, मनोरंजन, दिन महात्म्य इत्यादी गोष्टीसाठी प्रदर्शनीय फलक तयार करावा. सदर फलकावर दररोज नोंदी होतील याची दक्षताअभिरूप मुख्याध्यापक व विभागप्रमुख यांनी घ्यावयाची आहे.

२२. **आभार प्रदर्शन कार्यक्रम** ःमार्गदर्शक प्राध्यापक, अभिरूप मुख्याध्यापक व विभागप्रमुख यानी सदर कार्यक्रमाचे नियोजन करावे. सराव पाठ शाळेचेमुख्याध्यापक किंवा प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी यांचे सहकार्य व मार्गदर्शन याबद्दल पत्र देऊन जाहीर आभार मानावेत. कार्यानंद, स्वसमाधान व भावनिक तृप्तीने शाळेचे आवार सोडावे. शाळा व महाविद्यालय यांच्यामध्ये सौहार्दाचे वातावरण राहील याची काळजी सर्वानी घ्यावयाची आहे तसेचशाळांचे सहकार्य वर्षानुवर्षे राहील असे वर्तन विद्यार्थी शिक्षकांचे असावे.

क) उत्तर आंतरवासिता (Post-Internship)ः कालावधी एक आठवडा

महाविद्यालयामध्ये शालेय आंतरवासितेमधील विद्यार्थी शिक्षकांच्या अनुभवाचे व सर्व समावेशक कार्यानंदाचे मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मदतीने सादरीकरण कार्यक्रम आयोजित करावा. सादरीकरणासाठी प्रत्येक विद्यार्थी शिक्षकाने चिंतन दैनंदिनीचा वापर करावा. विद्यार्थी शिक्षकाने आलेले बरेवाईट अनुभव, ठळक घटना किंवा प्रसंग, अनुभव, अडचणी, त्यावर केलेली मात, काय शिकायला मिळाले इत्यादीबद्दल गटवार व गटाचे सर्व वर्गासमोर कथन करण्यास सांगावे.

आंतरवासिता कार्यक्रमाच्या कालावधीत विद्यार्थी शिक्षकानी राबविलेले नवोपक्रम व स्वतःहून सृजनात्मक केलेले कार्य यांचे प्रदर्शन/दिग्दर्शन/सादरीकरण करावे.

आंतरवासिता कार्यक्रमाच्या पुढील आयोजनासाठी सराव पाठ शाळेचेमुख्याध्यापक किंवा प्राचार्य व शिक्षक यांच्या सूचना व प्रत्याभरण घ्यावे.

महाविद्यालयाने आयोजित केलेल्या शालेय आंतरवासिता कार्यक्रमाच्या सर्व समावेशक संघटनाबद्दल व भावी कृतीसाठी विद्यार्थी शिक्षकांच्या सुधारणात्मक सूचना व प्रत्याभरण घ्यावे.

विद्यार्थी शिक्षकानी महाविद्यालयाकडे सादर करावयाचे अहवाल ः

शालेय आंतरवासितेमधील सर्व ११ आठवडे विविध अनुभूतीमध्ये विद्यार्थी शिक्षकांना पूर्णांशाने गुंतवून समृद्ध करावे.

गटवार अहवाल :

१. दिनदर्शीका

२. शेरे पुस्तक

३. सहशालेय उपक्रम नियोजन व आयोजन

४. शालाबाह्य शिक्षण उपक्रम

५. प्रदर्शनीय फलक दैनंदिन नोंदी

६. आभार प्रदर्शन कार्यक्रम

७. मासिक उपस्थिती पत्रक (Muster)

८. सामाजिक वृद्धी कार्यक्रम

९. अभिरूप शासकीय पाहणी

स्वतंत्र अहवाल :

१. सराव पाठ टाचण फाईल.

२. जादा तास टाचण मुद्दे

३. सहाध्यायी सराव पाठ निरीक्षण नोंद वही

४. एकंदर कामाची जबाबदारी अहवाल

५. घटक चाचणी व निकालपत्रक

६. दैनिक टाचण वही

७. व्यक्ती अभ्यास (Case Study)

८. कृती संशोधन

९. मानसशास्त्रीय चाचणी

१०. चिंतन दैनंदिनी

११. दरमहा उपस्थिती पत्रक (Catalogue)

१२. स्व विकास वृद्धी

टीप : ज्या उपक्रमामध्ये वेळापत्रक तयार केले असेल त्या ठिकाणी ते अहवालामध्ये जोडावे.

आंतरवासिता मूल्यमापन :

शिवाजी विद्यापीठ अभ्यासमंडळाने निर्धारित केलेल्या २५ गुण व १ क्रेडिट यानुसार एकूण ३२५गुणांची विभागणी मूल्यमापन करताना करावयाची आहे. मूल्यमापन करत असताना नोंद तक्ता हा प्रत्येक विभागानुसार असेल. मूल्यमापन करताना विद्यार्थी शिक्षकानी तयार केलेले अहवाल आणि त्याचा प्रत्यक्ष सहभाग यांचा विचार करून गुणदान केले जाईल. आंतरवासिता कालावधीमध्ये व शेवटच्या आठवड्यात मार्गदर्शक प्राध्यापकांनी शालेय संपर्क प्रमुखांशी चर्चा करून गुणदान करावे. आंतरवासिता कालावधी संपल्यानंतर उत्तर आंतरवसिता कार्यक्रमामध्ये विद्यार्थी शिक्षकानी सर्व अहवाल मार्गदर्शक प्राध्यापकांकडे जमा करणे गरजेचे आहे. गुणदान झाल्यानंतर मार्गदर्शक प्राध्यापक यांच्या सहीनिशी प्रमाणित करून त्याला अंतिम स्वरूप देण्यात यावे.

आंतरवासिता कार्यक्रम गुणदान विभागणी :

अ.न.		विषय/ कृती/ उपक्रम/ तपशिल	गुण	श्रेयांक
१	**सराव पाठविषयक :**			६
	१.१	निवडलेल्या दोन्ही अध्यापनशास्त्र विषयांचे सराव पाठ (एकूण ४0)	१२०	
	१.२	सहाध्यायी सराव पाठ निरीक्षणे (एकूण ३0)	१५	
	१.३	जादा तास/बुलेटिन तास/विविध मार्गदर्शन तास (किमान १0 पाठ)	१५	
२	**शालेय व सहशालेय उपक्रम नियोजन व आयोजन :**			२
	२.१	क्रीडा महोत्सव /सहल/ हस्तलिखीत /बौद्धिक स्पर्धा/वाचन संस्कृती/ विविध मंडळ स्थापन करणे व त्याद्वारे उपक्रम /स्वतः	३०	

		पुढाकार घेऊन राबविलेले उपक्रम		
	२.२	शालाबाह्य शिक्षण उपक्रम ः शिक्षक पालक संघ/ग्रामशिक्षण समिती सभा	१०	
	२.३	एकंदर कामाची जबाबदारी	१०	
३	**सामाजिक वृद्धी कार्यक्रम** ः सामाजिक जाणीव जागृती / पर्यावरण बचाव / उर्जा बचत / ग्राम पाहणी / विविध प्रदर्शन आयोजन / ग्रामीण वाचनालय भेट / कुटुंब पाहणी इत्यादी.		२५	१
४	**शिक्षक व व्यावसायिक कार्यक्रम** ः			
	४.१	मानसशास्त्रीय चाचणी	१०	
	४.२	घटक चाचणी व निकालपत्रक	१०	२
	४.३	दैनिक टाचण वही	१०	
	४.४	चिंतन दैनंदिनी	१०	
५	**प्रकल्प** ः			
	५.१	शालाधारित कृती संशोधन	२५	२
	५.२	व्यक्ती अभ्यास (Case Study)	२५	
		एकूण	३२५	१३